# संस्कृत भाषेचा वापर व्यावहारिक स्तरावर होणे गरजेचे - सागर




बलदेवानंद सागर, उमा वैद्य, रमाकांत पांडे आणि सहकारी.

प्रतिनिधी, नागपूर

**संस्कृत भाषेचा** व्यावहारिकस्तरावर अधिकाधिक वापर करणे गरजेचे असल्याचे मत आकाशवाणी व दूरदर्शनवरील संस्कृत वृत्त निवेदक बलदेवानंद सागर यांनी येथे व्यक्त केले. ते कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे आयोजित दोन दिवसीय संस्कृत संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमात बोलत होते.

देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. उमा वैद्य, प्रा. रमाकांत पांडे, कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, समन्वयक डॉ. नंदा पुरी, विद्यापीठ नियोजन विकास मंडळाचे संचालन डॉ. विजयकुमार आणि डॉ. कविता होले उपस्थित होते.

डॉ. उमा वैद्य म्हणाल्या, संस्कृतातील पारंपरिक विषयांना आधुनिक संदर्भात अभ्यासण्याचे काम या संमेलनाद्वारे करण्याचा मानस साध्य झाला. गोगटे जोगळेकर कॉलेजचा तन्मय हर्डीकर, जळगावच्या जेठा महाविद्यालयाची रेणुका रत्नपारखी या विद्यार्थ्यांनी संमेलनाविषयी मनोगत व्यक्त केले. प्रा. रमाकांत पांडे म्हणाले, महाराष्ट्राने कायमच नवीन मताची प्रस्थापना केली आहे. भट्टोजी दीक्षित, नागेश भट्ट, अप्पासाहेब रशिवडेकर, डॉ. वर्णेकर या विद्वानांची परंपरा महाराष्ट्राने पुढे नेण्याची अपेक्षा व्यक्त केली. अनेक ग्रंथ आणि विषय अस्पष्ट आहेत. त्यामुळे त्याचे परिशीलन युवा अभ्यासकांनी करावे आणि संस्कृत भाषा आणि शास्त्राध्याय परंपरा जपावी, असे आवाहन त्यांनी केले. संचालन डॉ. रेणुका बोकारे यांनी केले तर प्रा. डॉ. कविता होले यांनी आभार मानले.

## भागीरथ त्रिपाठी यांना कालिदास संस्कृत-व्रती राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

महामहोपाध्याय भागीरथ त्रिपाठी यांना शनिवारी महाकवी कालिदास संस्कृत-व्रती राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्रिपाठी यांचे चिरंजीव आशापती शास्त्री यांनी तो स्वीकारला. कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाव्दारे पं. रामनारायण शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने कालिदास संस्कृत-व्रती पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यंदा या पुरस्कारासाठी भागीरथ त्रिपाठी यांना जाहीर झाला होता. विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. उमा वैद्य यांच्या हस्ते आशापती शास्त्री यांनी तो स्वीकारला. ५० हजार रुपये रोख व गौरव पत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यांनी संस्कृत, हिंदी आणि इंग्रजी भाषेतून ५५ पेक्षा अधिक पुस्तके तर २०० पेक्षा जास्त हस्तलिखितांचे संपादन व प्रकाशन केले आहे.

लोकसत्ता Mon, 23 January 2017
epaper.loksatta.com/c/16651673